# आंतर महाविद्यालयीन क्रिकेट (मुले) स्पर्धा नियमावली-2025-26

उपरोक्त विषयानुसार नाशिक विभागातील सर्व शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालकांना कळविण्यात येते कि, आंतर महाविद्यालयीन क्रिकेट (मुले) स्पर्धा आयोजक व तांत्रिक समितीच्या सभेमध्ये झालेल्या निर्णयानुसार संघ संख्येचा विचार करून खालील नियमानुसार स्पर्धा आयोजित केल्या जातील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

- सर्व संघ व्यवस्थापकांनी आपले संघ आयोजकांनी दिलेल्या वेळेनुसार मैदानांवर उपस्थित करावेत. सामन्यांच्या वेळेमध्ये व तारखेमध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार आयोजक व नाशिक जिल्हा विभागीय क्रीडा समितीकडे राखीव असतील.
- सर्व सामने हे ICC च्या प्रचलित नियमां प्रमाणे घेतले जातील.
- संघ व्यवस्थापकांनी आपला संघ स्पर्धेत सहभागी होणार असल्याची सूचना सामन्याच्या एक दिवस आधी द्यावे.
- प्रत्येक संघाने सामन्यासाठी आपला चेंडू आणावा. आयोजक चेंडू सामान्यासाठी देणार नाहीत. (चेंडू हा SG/Vinod/AJ ४ पिस चेंडू असावा).
- तिसऱ्या फेरी पर्यंतचे सामने १५ षटकांचे घेण्यात येतील.
- अनामत शुल्क ५०० रू. आयोजकांकडे जमा केलेल्या संघांना स्पर्धेत सहभागी केलेले आहेत.
- खेळाडूंनी सामन्यांदरम्यान पंढरा गणवेश (White Kit) घालणे अनिवार्य आहे.
- फलंदाजाने, फलंदाजी करतांना हेल्मेट, गार्ड, फलंदाजी पॅड, ग्लोज (सेफ्टी साठी) परिधान करणे अनिवार्य आहे.
- सामन्यावेळी संघ वेळेत उपस्थित नसल्यास सामना सुरू होण्यासाठी झालेला उशीर लक्षात घेऊन संबंधित संघाच्या नियमाप्रमाणे ओवर कमी केल्या जातील किंवा विरोधी संघाला पुढील सामन्यात चाल देण्यात येईल
- काही तांत्रिक अडचणीमुळे स्पर्धेचे स्थळ अथवा वेळ बदल असल्यास तसे संबंधित संचालकास आणि ग्रुप वर कळवण्यात येईल
- सामना टाय झाल्यास सुपर ओवर होऊन सामन्याचा निकाल लागेल
- सामन्यावेळी संघ व्यवस्थापकाला स्पर्धेच्या ठिकाणी पूर्णवेळ हजर राहणे बंधनकारक आहे संघ व्यवस्थापक हजर नसल्यास संघ बाद करण्यात येईल आणि भरलेली अनामत रक्कम परत मिळणार नाही
- सर्व क्रीडा संचालकांनी आपले संघाचे ऑनलाइन फॉर्म भरून तयार ठेवावे व आयोजका कडे पहिल्या सामन्याच्या आधी जमा करावे त्या नंतर कोणताही बदल त्या मध्ये होणार नाही
- ज्या मैदानावर सामना होणार आहे तेथील क्रीडा संचालक आपणास कॉल किवा मेसेज द्वारे कळतील तरी सर्व सगळ्यांनी सहकार्य करावे

सामन्या पूर्वी आयोजक व सचिवांकडे आपले पात्रता फॉर्म ओळखपत्र जमा करावेत.

सचिव

नाशिक जिल्हा विभागीय क्रीडा समिती